Research Paper : In Economics

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

34

ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

# जागतिकीकरणाचा भारतीय आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर परिणाम

डॉ. ए. टी. तवार
विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.

ए. डी. मडावी
सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
आदर्श महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना :** आज जागतिकीकरणाचे युग आहे असे म्हटल्यास अतिशोक्ती होणार नाही. जगातील बहुतांश विकसनशील देश आपल्या देशाचा आर्थिक विकास नियोजनाचा मार्ग सोडून जागतिकीकरणाच्या मार्गानेकरीत आहेत. 1 जानेवारी 1995 ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाली आणि त्यातूनच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मूर्त स्वरूप धारण केले. भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला 1991 साली सुरुवात झाली. भारत सरकारने 1991 मध्ये आर्थिक सुधार कार्यक्रमात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या संकल्पनेला जास्त महत्त्व दिले. त्याचा परिणाम म्हणून भारतात अनेक प्रकारचे रचनात्मक व संस्थात्मक स्वरूपाचे बदल घडून आले आहेत. आर्थिक विकास करणाऱ्या अर्थव्यवस्थेत जगात चीननंतर भारताचाच क्रमांक लागतो. जागतिकीकरणामुळे भारतातील समाज जिवनावर फार मोठा बदल होत असलेला दिसून येतो. जागतिकीकरणाचा आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत होणारा परिणाम अध्ययनाच्या आणि संशोधनाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

आदिवासी समाज अत्यंत मागासलेला समाज म्हणून संबोधला जातो. प्रगत समाजाचा विचार करता आदिवासी समाज अजूनही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे. असे असले तरी पण आजच्या जागतिकीकरणाच्या युगात त्यांच्या जिवनमानात, राहणीमानात बदल होत आहे. शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, कुटुंब इत्यादींसारख्या महत्त्वपूर्ण अशा घटकांवर जागतिकीकरणाचा आदिवासी समाजावर अनुकूल परिणाम होत आहे तर जागातिकीकरणामुळे काही जटील अशा नविन समस्या निर्माण होत आहेत. यामध्ये वनहक्काची समस्या, शेतजमिनीची समस्या, शेतमजूराची समस्या, पर्यावरणविषयक समस्या इत्यादी अशा समस्या जागतिकीकरणामुळे आदिवासी समाजासमोर उभ्या राहिल्या आहेत. जागतिकीकरणाचा अवलंब करीत असतांना आदिवासी समाजात ज्या समस्या निर्माण होतात त्या दूर करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. त्यासाठी देशांतर्गत धोरणामध्ये व कायद्यामध्ये बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. तरच भारतातील 8.2% लोकसंख्या असणाऱ्या आदिवासी समाजाला जागतिकीकरणाचा फायदा होईल आणि प्रगत समाजाशी जोडला जाईल.

**भारतीय आदिवासी समाज :** जगाच्या सर्व भागात केवळ युरोप सोडून आदिवासी समाज आढळतो. भारतामध्ये जवळपास सर्वच राज्यात आदिवासी समाजाचे वास्तव्य दिसून येते. आदिवासी म्हणजे कोण? आदिवासी कोणाला म्हणायचे? असा प्रश्न पडतो. आदिवासी म्हणजे जे आदिकालापासून किंवा सुरुवातीपासून जंगलात वास्तव्य करून राहतात अशा लोकांचा समुह होय. आदिवासीला मुळचे रहिवासी असे सुद्धा म्हणतात. आदिवासी समाजाला अदिम समाज किंवा जमातिय समाज असे सुद्धा म्हटले जाते. भारतीय संविधानात आदिवासी म्हणून संबोधल्या गेलेल्या समुहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. या संज्ञेत आदिमजाती, वनवासी, गिरीजन या संज्ञाही अंतर्भूत आहेत.

**शिलाँग येथे 1962 मध्ये भरलेल्या परिषदेत आदिवासींची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.**

"आदिवासी किंवा जनजाती एक समानभाषा बोलणारा, एका पूर्वजातीपासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भुप्रदेशात वास्तव करणारा, तांत्रिक ज्ञान नसलेला किंवा त्यात मागासलेला, निरक्षर व रक्तसंबंधावर आधारीत सामाजिक व राजकीय प्रथांचे प्रामाणिकपणे पालन करणारा, एकजिनसी समुह आहे."

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

गिलीन ह्यांच्या मते - "एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."

आदिवासी समाज साधारणतः डोंगराळ प्रदेशात, जंगली भागात, दऱ्याखोऱ्यात वास्तव करून राहतो. वरील आदिवासी समाजाच्या व्याख्यावरून आदिवासी समाजाची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1) विशिष्ट भूप्रदेश :** भारतीय आदिवासी समाज एका विशिष्ट परंतु दुर्गम भूप्रदेशावर वसलेले असतात. आदिवासींचे त्या भागावर स्वामित्व असते. उदा. कोरकू ही आदिवासी जमात मेळघाट म्हणजे सातपुडा पर्वतात वसलेली आहे.

**2) लघु आकार :** आदिवासी समाज लोकसंखेच्या दृष्टिने लहान असतो. इतर कोणत्याही समाजाशी तुलना करता आदिवासी समाज हा अनेक बाबतीत लहान असतो. आदिवासी समाजाची विशिष्ट भूप्रदेशावरील लोकसंख्या शे-दोनशेच्याच घरात असते. थोड्या लोकांचा तो समुदाय असतो.

**3) विशिष्ट नाव :** आदिवासी समाजामध्ये प्रत्येक जमातीला विशिष्ट असे नाव असते. उदा. खासा, वारली, कातकरी इत्यादी विशिष्ट नावाचा विशिष्ट अर्थ असतो. उदा. कोरकू हा शब्द 'कर' या शब्दावरून बनला असून त्याचा अर्थ मानव असा होतो.

**4) सामान्य भाषा :** भारतीय आदिवासी समाजामध्ये एका जमातीची एकच अशी स्वतंत्र बोली भाषा असते. उदा. गोंडाची 'गोंडी भाषा' भिल्लांची भाषा 'भिल्ली' या भाषेला लिपी नसल्याने लोकगीते, लोककथा, नृत्ये, उखाणे इत्यादी साहित्य पुढील पिढीस तोंडीच हस्तांतरीत केले जाते.

**5) साधी अर्थव्यवस्था :** आदिवासींचे जिवन नैसर्गिक घटकावर अवलंबून असते. त्यांच्या गरजा कमी असतात, फक्त जिवन जगण्यासाठीच उत्पादन करतात. त्यांच्यात नफ्याची प्रवृत्ती नसते. विशेषीकरणाचा अभाव असतो. एकूणच आदिवासींची अर्थव्यवस्था साधीसरळ असते.

**6) समान धर्म :** निसर्गाच्या सतत सहवासाने व निसर्गाच्या ऋतुचक्रात व इतर चमत्कार या विषयी आदिवासी लोकांच्या मनात निसर्गा विषयी आदर असतो. अतिमानवी शक्तींना संतुष्ट करण्यासाठी आदिवासी लोक, भूतपूजा, देवपूजा व निसर्गपूजा करीत असतात.

**जागतिकीकरण म्हणजे काय?**

जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेत व्यापाराचा विस्तार, कक्षा व प्रमाण यात प्रचंड वाढ झाली आहे. भारत सरकारने 1990 च्या आर्थिक अरिष्टांवर मात करण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण अशा तिहेरी आर्थिक सुधारणा सुरु केल्या.

जागतिकीकरण म्हणजेच आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांची गर्यादा दूर करून त्यावरील सर्व अडथळ्यांची निती काढून टाकणे होय. जागतिकीकरण करणे म्हणजे जगातील सर्व देशाशी आपली अर्थव्यवस्था जोडणे होय. आपल्या देशाची अर्थव्यवस्था विदेशी लोकांसाठी पूर्णपणेमुक्त किंवा खुली करणे म्हणजेच जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाचे धोरण म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण असेही म्हणतात.

थोडक्यात जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत राहणारे रूपांतर होय. जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण व औद्योगीकीरणाचे, भांडवलीकरणाचे प्रमाण वाढत आहे.

**जागतिकीकरण व आदिवासी समाज :** 1991 च्या आर्थिक धोरणाची एकूणच अशी धारणा होती की, एकदा आर्थिक वृद्धीचा दर वाढला व त्याद्वारे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली की, आपोआपच दारिद्र्य आणि बेराजेगारीसारख्या समस्येचे निराकरण होईल. यालाच सर्वसाधारपणे 'झिरपण्याचा सिद्धांत' (Trickle Down Theory) असे म्हटल्या जाते. या धोरणाचे दोन भाग आहेत. 1) भाववाढ रोखणे, 2) अर्थव्यवस्थेचा ढाचा आणि

ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

रचना यामध्ये दूरगामी स्वरूपाचे बदल घडवून आणणे त्याचाच परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात मुलभूत स्वरूपाचे बदल घडलेले आहेत.

कुठलीही आर्थिक व्यवस्था ही लोकांसाठी अस्तीत्वात येते, लोक आर्थिक व्यवस्थेसाठी नसतात. समाजाने निर्धारीत केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी बाजार यंत्रणेला तयार करावयाचे असते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगक्षेत्र, सेवाक्षेत्र आणि शेतीक्षेत्र यात अनेक प्रकारचे बदल होत आहेत. आदिवासी समाज या क्षेत्रांशी अत्यंत कमी प्रमाणात जोडलेला आहे. कारण आदिवासींचा मुख्य व्यवसाय फळे-फुले गोळा करणे, मासेमारी, पशुपालन आणि शेत जमीन कसणे हा आहे. जागतिकीकरणामुळे जे बदल होतात किंवा फायदे होतात ते फायदे आदिवासी समाजाला मिळत नाही. याउलट औद्योगिकीकरणामुळे किंवा कारखानदारीमुळे या समाजात नविन अशा जटील समस्या समोर येत आहेत. एका दृष्टिने पाहिल्यास जागतिकीकरणामुळे प्रगत समाजामध्ये फार मोठा बदल होत आहे. याच धर्तीवर सकारात्मक विचार केल्यास आदिवासी समाजामध्ये सुद्धा चांगले परिणाम होत असल्याचे दिसून येते.

**जागतिकीकरणाचे आदिवासी समाजावरील अनुकूल परिणाम :**

**1) शैक्षणिक प्रगती :** जागतिकीकरणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून आदिवासी भागामध्ये कच्च्या रस्त्यांची सोय, पक्के रस्ते, डांबरीकरण, रेल्वेमार्ग, टपाल, दूरध्वनी, टि.व्ही. केंद्रे इत्यादी मुलभूत सोयी सुविधामध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे सांस्कृतिक व अन्य क्षेत्रामध्ये देवाण-घेवाण वाढली आहे. आदिवासी क्षेत्रात शासकिय आश्रमशाळा, शासकिय वस्तीगृहे, व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे सुरु झाल्यामुळे शैक्षणिक प्रगती होत आहे. शिक्षणासंबंधी आदिवासी समाजात जागृती वाढली आहे. स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

**साक्षरता दर (शेकडा प्रमाण)**

| वर्षे | भारत | | | आदिवासी समाज | | | एकूण भारत व आदिवासी समाजयातील तफावत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला | एकूण |
| 1961 | 34.44 | 12.95 | 24.02 | 13.83 | 3.16 | 8.53 | 20.61 | 9.79 | 15.49 |
| 1971 | 39.45 | 18.70 | 29.45 | 17.63 | 4.85 | 11.30 | 21.82 | 13.85 | 18.15 |
| 1981 | 46.89 | 24.82 | 36.23 | 24.52 | 8.04 | 16.35 | 22.37 | 16.78 | 19.88 |
| 1991 | 64.10 | 39.30 | 52.20 | 40.65 | 18.19 | 29.60 | 23.45 | 21.11 | 22.60 |
| 2001 | 75.30 | 53.70 | 64.80 | 59.17 | 34.76 | 47.10 | 16.13 | 18.94 | 17.70 |

**संदर्भ - प्रतियोगिता दर्पण / ऑगस्ट / 2009 / पृ. 85**

सन 1961 मध्ये आदिवासी समाजातील साक्षरता दर 8.53% होता तो सन 2001 मध्ये 47.10% पर्यंत वाढलेला आहे. तसेच आदिवासी समाजातील पुरुष साक्षरता दर सन 1961 मध्ये 13.83% एवढा होता तो सन 2001 मध्ये 59.17% पर्यंत वाढलेला आहे. याच कालावधीत आदिवासी महिला साक्षरता दर 3.16% वरून 34.76% पर्यंत वाढलेला आहे.

**2) गरीबीच्या प्रमाण घट :** आदिवासी समाजात अन्नधान्याचे उत्पादन करण्यासाठी आधुनिक तंत्र व उपकरणांची मदत घेतल्या जात आहे. शासनाकडून शेतीविषयक प्रशिक्षण आयोजीत केले जाते. जलसिंचनाच्या सोयी, आधुनिक व संकरीत बि-बियाण्यांचा वापर, रासायनिक खतांचा वापर वाढत आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ होऊन गरिबीचे प्रमाण कमी होत आहे.

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

**गरीबी रेषेखालील आदिवासी लोकसंख्या (टक्केवारीमध्ये)**

| विवरण | वर्ष 1993-94 | | वर्ष 2004-05 | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामिण | शहरी | ग्रामिण | शहरी |
| भारत | 37.30 | 32.40 | 28.30 | 25.70 |
| आदिवासी समाज | 51.94 | 41.14 | 47.30 | 33.30 |
| अंतर | 14.64 | 9.76 | 19.00 | 7.60 |

**संदर्भ- प्रतियोगीता दर्पण / ऑगस्ट / 2009 / पृ. 87**

आदिवासी समाजाच्या एकूण लोकसंख्यापैकी 90% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. सन 1993-94 मध्ये ग्रामीण भागात आदिवासी समाजातील 51.94% लोक दारिद्रय रेषेखालील जिवन जगत होते. तेच प्रमाण शहरीभागात 41.47% एवढे होते. त्यामध्ये काही प्रमाणात घट झाली आहे. सन 2004-05 मध्ये 47.30 पर्यंत ग्रामीण भागात तर 33.30% पर्यंत शहरी भागात आदिवासी समाजातील दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले.

**3) सामाजिक दृष्टिकोनात बदल :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत प्रगत व अदिवासी समाज एकमेकांना जोडला जात आहे. अर्धनग्न अवस्थेत वावरणारा आदिवासी समाज आज प्रगत समाजाप्रमाणे कपडे-लत्ते वापरू लागला आहे. झाडे-झुडपे, झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजाचे प्रमाण कमी होत आहे. आदिवासी लोक इमारती, सिमेंटची घरे बांधू लागली आहेत. स्त्रीयांच्या राहणीमानात बदल होत आहे. बाजारात उपलब्ध असलेली रंगीत मणी, माळा, चांदीचे अलंकार वापरण्याकडे महिलांचा कल वाढत आहे. घनदाट जंगलात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होत असून आदिवासी समाज शहरी भागाशी जोडले जात आहे. एकूणच जागतिकीकरणाच्या होणाऱ्या बदलामुळे आदिवासी समाज जिवनात महत्वपूर्ण असे चांगले बदल घडत आहेत आणि आदिवासी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रगती होताना दिसून येत आहे.

**4) राजकीय सहभागात वाढ :** आदिवासी समाजाचा लोकशाही शासनात सहभाग वाढत आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच राज्य आणि केंद्रस्तरावर होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार उभे करणे, मतदान करणे या सारख्या प्रक्रियेत सहभाग वाढत आहे. आदिवासी समाजावर होणाऱ्या अन्यायाचे, शोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी संघटना स्थापन करणे, आंदोलन करणे यासारखी कार्य आदिवासी समाजातील लोक करु लागले आहेत.

**5) आरोग्यविषयक सुधारणेतवाढ :** ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या सोयीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे पिढ्यान्-पिढ्या निर्माण होणारे रोग नष्ट होत चालले आहेत. गरोदर माता, बाळंतमातांना आधुनिक आरोग्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे गरोदरपणात किंवा बाळंतपणात मृत्यु पावणाऱ्या आदिवासी महिलांचे प्रमाण घटत आहे. आदिवासी समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी फिरते दवाखाने, स्वच्छ पाणीपुरवठा यासारख्या सेवा पुरविल्या जात आहेत. दळणवळण आणि वाहतुकीच्या साधनात वाढ झाल्याने त्वरीत उपचार केला जात आहे. एकूणच आदिवासी समाजाचे आरोग्य सुधारत आहे.

**जागतिकीकरणाचे आदिवासी समाजावरील प्रतिकुल परिणाम :** जागतिकीकरणाचे आदिवासी समाजावर अनेक चांगले परिणाम दिसून आले असले तरी त्याचे काही प्रतिकुल परिणामसुद्धा घडले आहेत. त्याला आदिवासी समाजासमोरील समस्या असे म्हणता येईल. जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण होत आहे. औद्योगिकरणासाठी मोठ्या प्रमाणात उद्योगांची आणि कारंखान्यांची स्थापना केली जात आहे. त्याचा परिणाम म्हणून आदिवासी समाजाच्या जिवनमानात नविन समस्या निर्माण होत आहेत.

सर्वसाधारणपणे भारतातील आदिवासी समाजामध्ये दोन प्रकारच्या समस्या दिसून येतात. त्यातील एक म्हणजे आदिवासी समाजाच्या पारंपारिक जिवन पद्धतीने निर्माण केलेल्या समस्या होय तर त्यांच्या जिवनात

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III,
September, 2016

दुसरी नविन समस्यांची निर्मिती इतर संस्कृतीच्या संपर्काने झालेली आहे. तेव्हा इतर संस्कृतीच्या संपर्कातून आदिवासी समाज जिवन ढवळून निघत आहे. त्यांच्या दुर्गम निवासस्थानापासून निर्माण झालेल्या समस्या व त्यात इतर समाजाच्या संपर्कातून निर्माण झालेल्या समस्यांची भर यामुळे आदिवासी समाजांचे प्रश्न जटिल स्वरूपाचे होत आहेत. याला जागतिकीकरणाचा आदिवासी समाजावर होणारा प्रतिकुल परिणाम म्हणता येईल. तो पुढील प्रमाणे स्पष्ट केला आहे.

**1) जंगल विषयक धोरणाचा परिणाम :** सुरुवातीच्या काळात संपूर्ण जंगलावर आदिवासी समाजाचा अधिकार होता. ते जंगलाचे अनभिषिक्त राजे होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे ते जंगलातील कोणतीही जागा निवडीत व त्यांच्या पद्धतीप्रमाणे ते शेती करीत पण जागतीकीकरणाच्या धोरणामुळे व जंगल विषयक कायदे केल्यामुळे आदिवासी समाजात जंगल विषयक अनिर्बंध स्वातंत्र्यावर मर्यादा आली. आदिवासी समाजाला अनुकूल व्हावेत असे सरकारी कायदे व धोरणाचे स्वरूप नाही.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आदिवासींना जंगलामधील नैसर्गिक वस्तूंचा उपभोग घेता येत नाही. जंगलातील पशुंची शिकार करणे, दारु गाळणे, मध गोळा करणे व जंगलातील इतर वस्तू गोळा करणे इत्यादीवर जंगल विषयक धोरण व कायद्यांनी निर्बंध निर्माण झाले आहे.

**2) सामाजिक प्रथांवर परिणाम :** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे सर्व जग एक होत आहे. जगातील कोणत्याही व्यक्तिला जगातील कोणत्याही ठिकाणी मुक्तपणे व्यवसाय करणे शक्य झाले आहे. यातच आदिवासी समाजाचा बाह्य लोकांशी संपर्क आल्याने आदिवासी समाजाच्या काही चांगल्या प्रथा इतिहास जमा होऊ लागल्या आणि अनिष्ठ प्रथांचा शिरकाव झाला. आदिवासी समाजात बालविवाहाची पद्धती नव्हती पण हिंदू समाजाच्या संपर्काने बाल विवाहाची प्रथा आदिवासी समाजात आली. आदिवासी समाजात वधु-मूल्य केवळ प्रतीक म्हणून घेतले जात होते. त्यामध्ये सामाजिक अशक्य होता परंतू सुधारलेल्या लोकांशी संपर्क आल्याने आदिवासी वधू-मूल्य पैशाच्या स्वरूपात मागू लागले आहे.

**3) जमिन मालकी व स्वामित्वावर परिणाम :** भारतात 1990 नंतरच्या काळात जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या तिनही प्रक्रिया गतिमान झाल्या आहेत. नैसर्गिक संसाधनांचा (Natural Resources) विकास करण्याच्या कार्याला गती आली आहे. आदिवासी समाजाचे निवास क्षेत्र असणाऱ्या भागातील नैसर्गिक संसाधनांवर मालकी हक्क कोणाचा? असा प्रश्न आदिवासी संस्था, संघटना व आंदोलन कर्त्यांनी उपस्थित केला आहे. वनजमिनी व नैसर्गिक संसाधनांवर फक्त आदिवासींचाच हक्क अशी त्यांची घोषण आहे. जागतिकीकरणच्या प्रक्रियेमुळे नैसर्गिक संसाधनावरील स्वामित्व हक्क सोडण्याची झळ ही त्या प्रदेशातील आदिवासी समाजाला सर्वात अधिक बसते. हे पिढ्यान्-पिढ्या अनुभवातून आदिवासी शिकले आहेत. वनजमिनी व नैसर्गिक संसाधनांवर मालकी हक्क यासाठी झालेल्या विविध आंदोलनात आदिवासी आंदोलकांवर पोलीसांनी अश्रुधूर, लाठीमार व त्याही पुढे गोळीबार ह्यांचा वर्षाव केला आहे.

**4) आदिवासी शोषणावर परिणाम :** भारतात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रिया अधिक गतिमान झाल्याने आदिवासी शोषणाचे नविन प्रकार समोर येऊ लागले आहेत. दारिद्र्याच्या कारणामुळे अर्धपोटी अवस्थेतील जिवनस्थितीला कंटाळलेले आदिवासी थोड्याफार प्रलोभनामुळे आपला निवास प्रदेश सोडून अलग निवास करण्यास तयार होऊ लागले आहेत. चहामळे, खाणी यासारख्या काही उद्योग-व्यवसायातील ठेकेदार अल्प मजुरीत आदिवासी कामगारांना रोजगाराच्या संधी देत आहेत. किमान वेतन वा मजूरी कायद्याचे उल्लंघन करून आदिवासी कामगारांची उद्योग व्यवसायांमध्ये मोठ्या संख्येत होणारी भरती ही यापूर्वीच्या काळातील वेठबिगार पद्धतीचे नविन रूप आहे. आदिवासींच्या शोषण प्रक्रियेने जागतिकीकरणामुळे नविन रूप धारण केले आहे.

आदिवासी समाजाच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन औद्योगिक क्षेत्राच्या आस-पास राहणाऱ्या आदिवासी स्त्रियांना वेश्यावृत्तीचा स्वीकार करण्यास भाग पाडले जात आहे. त्याचबरोबर सावकार, दलाल, व्यापारी,

ISSN 2278-8204
Vol.V. Issue : III, September, 2016

जंगल आधिकारी आदिवासी स्त्रियांना शरीर बहाल करण्यास प्रवृत्त करतात.

**5) वनहक्कावर परिणाम :** आदिवासी समाजाचे जंगल संपत्ती हे जिवन जगण्याचे एक प्रमुख साधन आहे आणि याच कारणामुळे वनसंपत्तीवर आदिवासींचा हक्क असणे हे अधिक तर्कसंगत व स्वाभाविक आहे. जागतिकीकरण आणि औद्योगिकरणात विकासाच्या नावावर मोठ्या प्रमाणात जंगलतोडीचे प्रमाण वाढत आहे. सरकारने आदिवासींच्या क्षेत्रात बांध, धरणे, कालवे काढले आहेत, कारखाने उभारले आहेत यामुळे आदिवासींना आपले वसतीस्थान सोडून दुसरीकडे स्थलांतर करावे लागत आहे. सरकारच्या जंगलविषयक कायदे व धोरणामध्ये केलेल्या बदलामुळे आदिवासी समाजाला शिकार करणे, जंगलातून वस्तू गोळा करणे आणि आपली उपजिवीका भागविणे कठिण झाले आहे. वेगवेगळ्या कायद्यामुळे व जंगलाचे व्यापारीकारणामुळे आदिवासी समाजाला जंगल संपत्तीवरील परंपरागत अधिकार नाहीसा झाला आहे.

**6) शेती व्यवसायावर परिणाम :** आदिवासी लोक एकाच ठिकाणी शेती करीत नाही. शेती व्यवसाय स्थलांतरीत स्वरूपाचा असतो. सावकार, ठेकेदार, व्यापार वर्ग त्यांचा उत्पादीत शेतमाल कमी भावात घेऊन तो शेतमला जास्त भावात विकतात आदिवासी समाजात अडाणी व अशिक्षीतपणाचे प्रमाण जास्त आहे. बहूतेक व्यवहार वस्तुविनीमय पद्धतीनेच होतात, या समाजात पैशाचा फारसा वापर होत नाही. या अशा अडाणी व अशिक्षीतपणाचा फायदा सावकार वर्ग, कारखानदारवर्ग घेत आहे. त्यांच्या जमिनी हस्तगत केल्या जात आहेत. शेतजमीन कमी किंमतीला खरेदी करून त्यांची लुबाडणूक केली जात आहे. आदिवासींना कमी मोबदला देऊन जमिनदारवर्ग, भांडवलदारवर्ग त्यांच्याच शेतजमीनीवर त्यांना राबवून घेत आहेत.

**7) पर्यावरण प्रदुषणावर परिणाम :** आदिवासी समाज निसर्गाच्या सानिध्यात, निसर्गरम्य अशा वातावरणात वावरणारा समाज आहे. झाडाझुडपात, दऱ्या-खोऱ्यात डोंगरात, पहाडात अश्या भौतिक परिघात आपले जिवन जगत करतो. आदिवासी क्षेत्रात पोलादाचे कारखाने, चहाचे मळे, कोळशाच्या खाणी कार्यन्वीत होत आहेत. यामुळे आदिवासी भागात पर्यावरण प्रदुषणाचा परिणाम आदिवासी समाजाच्या जिवनमानावर होत आहे.

पर्यावरण प्रदुषणामुळे तापमानात वाढ होणे, पावसाचे कमी प्रमाण होणे, पाण्यात व अन्नात रासायनिक घटकांचे प्रमाण वाढणे इत्यादी असे बदल आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाच्या जीवनावर याचा वाईट परिणाम होत आहे.

**निष्कर्ष :** वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, जागतिकीकरण समाज परिवर्तनासाठी आवश्यक आहे. कारण यामुळे समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक व राजकीय अशा अनेक घटकात चांगला बदल घडून येतो. आदिवासी समाजामध्ये तसे बदल घडत आहेत पण काही प्रतिकुल परिणाम आदिवासी समाजावर होत आहेत. त्यामुळे जागतिकीकरणाचा अवलंब करीत असताना भारतातील सरकारी धोरणामध्ये बदल करणे आवश्यक आहे. आदिवासीच्या शेतजमीनी, वनहक्क, स्थलांतरण, विस्थापन इत्यादी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सरकारी धोरणांमध्ये योग्य ते बदल करणे आवश्यक असून त्याधोरणांची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. तरच आदिवासी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत चांगला बदल घडून येईल.

**संदर्भ :**

1. श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे : भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)
2. डॉ. नीलम ताटके : समाजशास्त्र
3. डॉ. भा.की. खडसे : आदिवासी समाजाचे समाजशास्त्र
4. डॉ. भा.की. खडसे : भारतीय समाज
5. डॉ. शौनक कुलकर्णी : महराष्ट्रातील आदिवासी
6. डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. एस.जी. देवगांवकर : आदिवासी विश्व
7. गुरुनाथ नाडगोंडे : भारतीय आदिवासी
8. रा.ज.लोटे : भारतीय समाज आव्हाने आणि समस्या
9. प्रतियोगिता दर्पण, ऑगस्ट 2009